वर्ष : ०५ | अंक: १८ | मुंबई, मंगळवार २६ मार्च २०१९ ते १ एप्रिल २०१९ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

PG 2

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

मुंबई महानगरात सव्वा दोन लाख रिक्त घरे !

3 → लोकसभा निवडणुकीतील फटाके

१२ घराण्यांच्या अवतीभोवतीच फिरत असते महाराष्ट्राची सत्ता ← 4

# महाआघाडीतल्या ५६ पक्षांच्या पराभवासाठी महायुतीचे पाच पांडव पुरेसे



**कोल्हापूर- महाराष्ट्रात बोलघेवडे लोक खूप आहेत त्यातच हल्ली बारामतीचा पोपट खूप बोलू लागला आहे आमचे कपडे कोणीच करू शकणार नाही पण तुमच्या अंगावर आता काही शिल्लकच राहिले नाही अशी टीका राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापुरात केली आहे तसेच आमची इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी तर तुमची काय भ्रष्टाचार मॅनेजमेंट कंपनी का? असा सवाल देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. येथील तपोवन मैदानावर भाजप-शिवसेना युतीच्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचार प्रारंभ सभेमध्ये ते बोलत होते.**

यावेळी दोन्ही नेत्यांनी श्रीफळ वाढवून लोकसभेच्या प्रचाराचा शुभारंभ केला. या सभेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे, भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील, रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाचे रामदास आठवले, राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर, राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांच्यासह इतर घटक पक्षांचे नेतेही उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देश चालविण्यासाठी ५६ पक्ष लागत नाहीत. त्यांच्यावर भरवश्यावर देश चालत नाहीत. ५६ इंचाची छाती लागते. शेतकरी, सर्वसामान्यांच्या पाठीशी राहणारे आमचे पक्ष आहे. भाजप, सेना आणि मित्रपक्षांच्या माध्यमातून जनतेच्या पाठबळावर बलशाली सरकार सत्तेमध्ये येणार आहे. आता केवळ लीड मोजणे बाकी आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

फडणवीस म्हणाले, मुंबईत अरबी महासागर आणि कोल्हापुरात जनतेचा महासागर आहे. आम्ही एकत्रपणे पुढे जात आहोत. भाजप-सेनेची युती सत्तेसाठी नाही. विचारांची युती आहे. आमचा हिंदुत्ववाद संकुचित नाही. जाती, भाषेच्या पलीकडील हिंदुत्ववाद आहे. केवळ नावामध्ये राष्ट्रवादी असून चालत नाही. मनात राष्ट्रवाद असावा लागतो. महाआघाडीतल्या ५६ पक्षांच्या पराभवासाठी महायुतीचे पाच पांडव पुरेसे आहेत, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाआघाडीचा समाचार घेतला. कॅप्टनने सुद्धा माढातून माघार घेतली आहे. ओपनिंग बॅट्समनच म्हणतोय की मी बारावा गडी म्हणून काम करतो. माढ्यातून माघार घेणाऱ्या शरद पवारांना टोला हाणण्याची संधी देखील फडणवीसांनी सोडली नाही.

राज ठाकरेंवर टीका करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बारामतीच्या पोपटाला सांगू इच्छितो की आमचे कपडे कोणी उतरवू शकत नाही. तुमचे आधी विधानसभेत आणि मग लोकसभेत कपडे उतरले, मुंबई महापालिकेत उरलेलं लंगोटही उद्धव ठाकरेंनी उतरवलं. पोपटाला सल्ला देतो की मोदी सुर्यासारखे आहेत, त्यांच्यावर थुंकलात तर थुंकी तुमच्याच तोंडावर पडल्याशिवाय राहणार नाही. कोणाची सुपारी घेण्यापेक्षा दुपारी घरी शांत बसा आणि मोदी कसे पंतप्रधान बनतात ते पाहा.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले, विरोधकांमध्ये आता कोणी शिल्लक राहिले नाही. जागा वाटपवारुन त्यांच्यामध्ये वाद सुरू आहे. गिरीश महाजन दिसले की, विरोधकांना धडकी भरते. काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीची अवस्था पंक्चर असलेल्या टायर सारखी झाली आहे.

उर्वरित पृष्ठ 2 वर




| | | | |
|---|---|---|---|
| परळ 022 2412 4749 | कांदिवली 022 2863 1255 | गोरेगाव 022 2873 7788 | विरार 0250 250 4688 |
| भांडुप 022 2594 5666 | बोरीवली 022 2848 1159 | मिरारोड 022 2810 6101 | डोंबिवली 0251 243 0072 |

# लोकसभेला मतदान न केल्यास बँक अकाऊंटमधून ३५० रुपये वजा होणार

***नवी दिल्ली - आगामी लोकसभा निवडणुकांमध्ये मतदान न करणे महागात पडणार आहे. निवडणूक आयोगाने मतदान न करणाऱ्या नागरिकांविरुद्ध एक आदेश जारी केला आहे. त्यानुसार, मतदान न करणाऱ्या व्यक्तींची ओळख आधारकार्डद्वारे होणार आहे. तर, या कार्डद्वारे लिंक असलेल्या बँकेतून ३५० रुपये वजा होणार आहेत. विशेष म्हणजे निवडणूक आयोगाने यांसदर्भात सर्वच सरकारी बँकांना आदेश दिले आहेत.***

निवडणूक आयोगाने या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची ताकीदही सर्व बँकांना दिली आहे. आयोगच्या प्रवक्त्यांनी दिल्लीतील पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. देशातील सर्वच मतदारांना लक्षात घेऊनच मतदान प्रक्रियेची तयारी करण्यात येते. त्यामुळे जे मतदार मतदानाचा हक्क बजावत नाहीत, त्या मतदारांसाठी निवडणूक आयोगाने केलेला खर्च वायपट जातो. प्रत्येकी एका मतदानासाठी आयोगाला ३५० रुपये खर्च येतो. म्हणूनच, जो मतदार मतदान करणार नाही, त्या मतदाराकडून निवडणूक आयोग ३५० रुपये वसुल करणार आहे.



विशेष म्हणजे ज्या मतदारांचे बँक अकाऊंट नसेल, त्या मतदारांकडून मोबाईल फोनचे रिचार्ज करताना हे ३५० रुपये वसुल केले जाणार आहेत. त्यासाठी कमीत-कमी ३५० रुपयांचा रिचार्ज करावा लागणार आहे. त्यापेक्षा कमी रकमेचा रिचार्ज फोनवरुन होणार नाही. विशेष म्हणजे, आयोगाच्या या आदेशाविरुद्ध कुणीही न्यायालयात दाद मागू नये, यासाठी अगोदरच आयोगाने न्यायालयाकडून या आदेशाची परवानगी घेतली आहे. दरम्यान, देशात लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या असून ७ टप्प्यात या निवडणुका पार पडणार आहेत. तर २३ मे रोजी निवडणुकांचा निकाल जाहीर होणार आहे. आयोगाच्या आदेशानुसार सध्या देशात आदर्श आचासंहित लागू करण्यात आली आहे

# मिरा–भाईंदरमध्ये ५८ पैकी ४३ बस अनफिट

## फिटनेस सर्टिफिकेटशिवाय रस्त्यावर धावत आहेत बसेस, प्रवाशांची सुरक्षा रामभरोसे

**भाईंदर - मिरा-भाईंदर महापालिकेच्या स्थानिक परिवहन सेवेतील ५८ पैकी तब्बल ४३ बस प्रादेशीक परिवहन विभागाच्या फिटनेस सर्टिफिकेट शिवाय अनफिट ठरल्या असतानाही त्या प्रवाशांना सेवा देण्यासाठी रस्त्यावर धावत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे हजारो प्रवाशांची सुरक्षा रामभरोसे असल्याचे स्पष्ट झाले असून भविष्यात दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.**

यापुर्वी सुद्धा परिवहन सेवेच्या काही बस अनफिट असतानाही रस्त्यावर धावत असल्याचे उघडकीस आले होते. अनफिट असतानाही बस प्रवासी सेवा देत असल्याची तक्रार प्राप्त होताच प्रादेशिक परिवहन विभागाने पालिकेच्या काही बस जप्त केल्या होत्या. यानंतर पुन्हा




असा प्रकार घडला असून पालिकेची परिवहन सेवा असुरक्षित असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. पालिकेने २०१५ पासून आत्तापर्यंत ५८ नवीन बस खरेदी केल्या आहेत. अवघ्या ३ वर्षातच त्या भंगारावस्थेकडे झुकू लागल्या आहेत. प्रशासनाने त्या बसच्या दुरुस्तीवर अद्यापपर्यंत सुमारे २ कोटींहून अधिक खर्च केला असतानाही बस अनफिट ठरु लागल्याने बसच्या दुरुस्तीवर होणारा खर्च कुठे गेला, असा प्रश्न सध्या उपस्थित होऊ लागला आहे.

### बसखरेदीत मोठा गैरव्यवहार झाल्याची शक्यता

या बसमधून दररोज हजारो प्रवासी प्रवास करीत असून त्यांची सुरक्षाच धोक्यात आली आहे. पालिकेने तत्कालिन जवाहरलाल नेहरु पुनरुत्थान योजनेंतर्गत खरेदी केलेल्या बस नियमानुसार युरो ३ (बीएस ३) तंत्रज्ञानावर आधारीत असणे बंधनकारक असताना त्या युरो २ (बीएस २) या तंत्रज्ञानावर आधारीत खरेदी करण्यात आल्याचे समोर आले आहे. यात मोठा गैरव्यवहार झाल्याची शक्यता वर्तविली जात असून त्याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. जुन्या तंत्रज्ञानावर आधारीत असलेल्या बसला फिटनेस सर्टिफिकेट देण्यास प्रादेशिक परिवहन विभागाकडून नकार देण्यात येत असतानाही पालिकेचा हा खरेदीचा खटाटोप कशासाठी व कोणासाठी करण्यात आला, असा संशय व्यक्त होऊ लागला आहे.

# वडिलोपार्जित जमीन बाहेरच्या व्यक्तीस विकता येणार नाही



**नवी दिल्ली:** सवोच्च न्यायालयाने नुकतेच 'वडिलोपार्जित कृषी जमीन' विषयी मोठा निर्णय घेतला आहे. जर वारसदाराला वडिलोपार्जित कृषी जमीनचा एक हिस्सा विकायचा असेल, तर त्याला घरच्या व्यक्तीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. वारसदार आपली मालमत्ता कोणत्याही बाह्य व्यक्तीला विकू शकत नाही. कारण जस्टिस यूयू ललित व एमआर शाहच्या पीठने हा निर्णय हिमाचल प्रदेशच्या एका प्रकरणसंबंधी दिला आहे. या प्रकरणात याचिका दाखल करण्यात आली आहे की, कृषी जमीनचा समावेश कलम २२ च्या तरतुदींमध्ये आहे.

कलम २२ मध्ये तरतूद आहे की, मृत्यूपत्र न लिहिता एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याच्या मालमत्तेवर वारसदार असतात. या वारसदाराला आपला हिस्सा विकायचा असेल, तर त्याला आपल्या इतर वारसदारांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. पीठने सांगितले की, कृषी जमीन देखील कलम २२ च्या तरतुदींनुसारच लागू होईल. त्याचबरोबर या तरतुदीचा हेतू असा आहे की, कुटुंबातील संपत्ती बाहेरच्या व्यक्तीकडे न जात वारसदारालाच मिळाली पाहिजे.

# ज्योतिषाचे भाकीत: नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधान होणार पण

**पुणे-** येणाऱ्या २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहूमत मिळणार नाही. परंतु घटक पक्षांच्या सहकार्याने भारतीय जनता पक्ष केंद्रात सरकार स्थापन करेल आणि नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधान होतील. पण हे सरकार पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणार नाही. २०२२ साली मध्यावधी निवडणुकांना देशाला सामोरे जावे लागेल, असे भाकीत बृहन् महाराष्ट्र ज्योतिष मंडळाचे अध्यक्ष ज्योतिषरत्न नंदकिशोर जकातदार यांनी व्यक्त केले आहे. जसजसे निवडणुकांचे वातावरण तापू लागले तसेतसे नेते मंडळींबरोबरच आता भविष्यवेत्तेही आपली भाकिते व्यक्त करु लागली आहेत. पुणे येथे बृहन् महाराष्ट्र ज्योतिष मंडळाचे अध्यक्ष ज्योतिष नंदकिशोर जकातदार यांनी आपले भाकीत वर्तवले. तसेच त्यांनी राज्यात शिवसेनेच्या जागा निम्म्याहून कमी होतील असेही सांगितले आहे.



राज्यात गेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेना पक्षाच्या १८ जागा आल्या होत्या. परंतु यंदा मात्र त्या निम्म्याने कमी होणार आहेत. भारतीय जनता पक्षाच्या दोन ते तीन जागा कमी जास्त होतील. बारामतीमधून सुप्रीया सुळे, शिरूरमधून डॉ.अमोल कोल्हे, अहमदनगरमधून संग्राम जगताप, सोलापूरमधून सुशिलकुमार शिंदे हे निवडून येणार आहेत.

उर्वरित पृष्ठ 2 वर

# राज ठाकरे राष्ट्रवादीचे 'स्टार प्रचारक'?



**पुणे- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांचा पक्ष आगामी लोकसभा निवडणूक लढवणार नसल्याचे स्पष्ट केले असले तरी ते निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे स्टार प्रचारक असतील, अशी चर्चा आहे. मात्र, त्यांचा नक्की सहभाग कशा प्रकारे असेल, ते राष्ट्रवादीच्या मंचावरुन प्रचार करणार की मनसेच्या मंचावरुनच करणार, याबाबत संदिग्धता आहे.**

ज्या मतदार संघात राष्ट्रवादी समोर भाजपा- शिवसेनेचे कडवे आव्हान असेल त्या मतदार संघात राज ठाकरे यांच्या सभांचे आयोजन केले जाईल, अशी माहिती राष्ट्रवादीच्या सूत्रांनी दिली आहे. राज ठाकरे यांनी दोन दिवसांपूर्वी मुंबईत शरद पवार यांची भेट घेतली. शरद पवार यांच्या निवासस्थानी या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली होती. तसेच राज ठाकरे यांनी आगामी लोकसभा निवडणूक लढवणार नाही, असे जाहीर केले आहे. रंगशारदा येथे मनसे कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना राज ठाकरे यांनी नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली होती. मोदी आणि शहामुक्त भारतासाठी भाजपाविरोधात मतदान करा, त्याचा फायदा कोणाला होतो याचा विचार करु नका, असे सूचक विधान त्यांनी केले होते. राज ठाकरे यांनी भाषणांमधून मोदी- शाह यांच्यावर बोचरी टीका केली होती.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मनसेला महाआघाडीत स्थान देण्यास तयार होते. मात्र, काँग्रेसने मनसेला विरोध दर्शवला होता. त्यामुळे आता राष्ट्रवादीने मनसेशी छुपी आघाडी करण्याची भूमिका घेतल्याचे समजते. इंडियन एक्स्प्रेसला राष्ट्रवादीतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ज्या मतदारसंघात राष्ट्रवादीसमोर भाजपा – शिवसेनेचे कडवे आव्हान असेल, त्या मतदारसंघात राज ठाकरे हे सभा घेतील. आता राष्ट्रवादीची ही रणनिती यशस्वी होते का, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

# घराचा पाया खोदताना सापडले सोन्याच्या नाण्यांनी भरलेले घडे

**धुळे-** पोलीसनामा ऑनलाइन - शिरपूर तालुक्यातील थाळनेर गावात घर बांधण्यासाठी पाया खोदत असताना सोन्याच्या नाण्यांनी भरलेले दोन घडे सापडल्याची घटना घडली आहे. ही घटना दोन महिन्यानंतर उघडकीस आली. पोलीसांनी घडे जप्त केले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती, थाळनेर गावातील बुधा मराठे यांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर मिळाले आहे. घर बांधण्यासाठी पाय खोदण्याचे काम सुरु होते. बांधकाम जलद गतीने होण्यासाठी पाया खोदण्याचे काम मजूरांना दिले होते. खोदकाम सुरु असताना मजूर राकेश सुभाष सावळे व दिलीप दशरथ भोई यांना सोन्याने भरलेले घडे असल्याचे दिसले. ते घडे हडपण्याचा त्यांनी विचार केला. दिवसा घडे काढणे शक्य नसल्याचे लक्षात आल्यावर मजुरांनी मराठे यांना आम्ही उद्या येतो असे सांगितले. दुसऱ्या दिवशी मराठे काम पाहण्यासाठी गेले असता त्यांनी मातिने माखलेले घडे मजुरांनी उचलून नेताना पाहिले. त्यानंतर सावळे यांच्यावर ५० - ६० लाखांची देवाण घेवाण करण्याचा आरोप करत सर्व दागिने जप्त करुन सरकारी खजिन्यात जमा करावे अशी मागणी करत मराठे यांनी थाळनेर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली.





# मुंबई महानगरात सव्वा दोन लाख रिक्त घरे!

**मुंबई-** गेली काही वर्षे आर्थिक मंदीचा सामना करणारा बांधकाम उद्योग सध्या ग्राहक नसल्याने अधिकच अडचणीत आला आहे. मुंबई महानगरात रिक्त असणाऱ्या घरांची संख्या सव्वा दोन लाखांवर पोहोचली आहे. रिक्त घरांचे काय करायचे, असा प्रश्न विकासकांना पडला आहे. मुंबई, ठाणे तसेच विस्तारित उपनगर अशा मुंबई महानगर प्रदेशात २०१८ अखेर न विकल्या गेलेल्या घरांची संख्या २,१९,४९१ इतकी होती. २०१७ अखेर हा आकडा २,२६,००६ इतका होता. २०१८ अखेर मुंबई महानगर प्रदेशात ५९,९३० इतक्या नव्या घरांची निर्मिती झाली तर ६६,९७० घरे विकली गेली. पुण्याचा विचार केला तर २०१८ अखेर न विकल्या गेलेल्या घरांची संख्या ८७,४०३ इतकी होती. ती २०१७ अखेर ९७,४२४ एवढी होती. त्याचवेळी पुण्यात २४,४३० नवी घरे बांधण्यात आली तर ३०,७३० घरांची विक्री झाली. विविध सर्वेक्षणे करणाऱ्या संस्थांनी ही ढोबळ आकडेवारी प्रसिद्ध केली आहे.

बांधकाम उद्योगाला आता आलिशान घरांऐवजी छोट्या घरांच्या निर्मितीकडे अधिक लक्ष द्यावे लागणार आहे. तसे केल्यास रिक्त घरांची संख्या कमी होण्याची शक्यता असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे. 'नॅशनल रिएल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल' (नरेडको) या केंद्र शासनाच्या अखत्यारीत असलेल्या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष निरंजन हिरानंदानी यांनीही त्यास दुजोरा दिला. यापुढे विकासकांकडून मुंबईत प्रामुख्याने वन किंवा टू बीएचके घरेच बांधली जाणार आहेत. ग्राहकांच्या मागणीनुसार छोट्या घरांचे प्रकल्प उभारण्यावर यापुढे निश्चितच भर दिला जाणार आहे, असे हिरानंदानी यांनी सांगितले.

**उपनगरात सर्वाधिक रिक्त घरे**

रिक्त घरांचा आकडा चिंताजनक आहे हे निश्चित. पण तो मुंबई, ठाण्याचा नाही. वसई-विरार, नवी मुंबई, पनवेल, बदलापूर, कल्याण, टिटवाळा, पालघर, बोइसर आदी विस्तारित उपनगरांत अशी रिक्त घरे प्रामुख्याने उपलब्ध आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे गुंतवणूकदारांचा विकासकांवरील उडालेला विश्वास.

## पालिकेच्या इंग्रजी शाळांसाठी लवकरच ८७६ शिक्षकांची भरती

**मुंबई-** मुंबई महापालिकेच्या मराठी माध्यमाच्या शाळा विद्यार्थ्यांच्या गळतीमुळे एकापाठोपाठ एक बंद पडत असताना पालिकेने इंग्रजी शाळांचा दर्जा सुधारण्यास सुरुवात केली आहे. पालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा आणि पब्लिक स्कूलमध्ये लवकरच ८७६ शिक्षकांची भरती केली जाणार आहे. पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे वाढलेला कल लक्षात घेऊन रिक्त जागा तातडीने भरण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. पालिकेच्या विविध भाषिक शाळांमध्ये सध्या उर्दू आणि हिंदी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर पालिकेने सेमी इंग्रजी शाळा सुरू केल्या आहेत. पहिलीपासून पूर्ण इंग्रजी असलेल्या पब्लिक स्कूलही सुरू करण्यात आल्या आहेत.



या शाळांमध्ये इंग्रजीचे उत्तम ज्ञान असलेल्या शिक्षकांची भरती करण्याची गरज असल्यामुळे पालिकेने मेगा भरतीची जाहिरात काढली आहे.

## मोनोच्या प्रवाशांची स्वच्छतागृहांअभावी कुचंबणा

**मुंबई-** मुंबईकरांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी 'मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'ने (एमएमआरडीए) तब्बल तीन हजार कोटी रुपये खर्च करून चेंबूर ते संत गाडगे महाराज चौक अशी मोनोरेल सेवा सुरू केली खरी, पण इथल्या १७ 'सुसज्ज' स्थानकांवर एकही स्वच्छतागृह नसल्याने प्रवाशांची कुचंबणा होत आहे. इतकेच काय तर नवीन स्थानकांवर बाकही नसल्यामुळे गाडीच्या प्रतीक्षेत प्रवाशांना ताटकळावे लागत आहे.

राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या हस्ते २००९ मध्ये चेंबूर ते वडाळा या ८.२६ किलोमीटर अंतराच्या मोनो प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले होते. दोन वर्षांत हा पहिला टप्पा पूर्ण करण्याचे नियोजन होते. प्रत्यक्षात फेब्रुवारी, २०१४ला चेंबूर ते वडाळा या मार्गावर पहिली मोनो धावली. याच दरम्यान



वडाळा ते गाडगे महाराज चौक या ११.२८ किमीच्या दुसऱ्या टप्प्याचे कामदेखील सुरू करण्यात आले. मात्र काही हा टप्पा सुरू होण्यास मार्च, २०१९ उजाडले. या दोन्ही टप्प्यांसाठी २ हजार ४६० कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. मात्र, प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झाल्याने खर्च तीन हजार कोटींच्या घरात पोहोचला. पण इतका खर्च करूनही मोनोच्या प्रवाशांसाठी स्थानकांवर साधी स्वच्छतागृहेही नाहीत. त्यामुळे मोनो प्रवाशांची गैरसोय होत आहे.

मोनो रेलच्या स्थानकांत सरकते जिने, उद्वाहने (लिफ्ट) अशी सोय आहे. मात्र एकाही स्वच्छतागृह नाही. सध्या गाड्यांची संख्या कमी असल्याने २० ते ३० मिनिटांच्या अंतराने मोनो रेल धावत आहे. त्यामुळे एक गाडी चुकली तर प्रवाशांना बराच वेळ स्थानकांवर तिष्ठत उभे राहावे लागते.

## हजारो एकर भूखंड विकासकांना आंदण देण्याचा डाव

**मुंबई-** कमाल जमीन धारणा रद्द झाल्यानंतर सरकारने भूखंड ताब्यात घेऊन दुर्बलांसाठी घरे बांधावीत, असा आदेश उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने दिल्यानंतर या आदेशाची अंमलबजावणी करण्याऐवजी मंत्रिमंडळाने सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण यांची समिती नेमली. या अहवालाचा आधार घेत शासनाने सर्वोच्च न्यायालयात विकासकांनी दाखल केलेली आव्हान याचिका मागे घेण्यासाठी प्रयत्न चालविले आहेत. मात्र हे प्रयत्न म्हणजे सामान्यांच्या घरांसाठी उपलब्ध होणारा हजारो एकर भूखंड विकासकांच्या घशात घालण्याचा डाव असल्याचा आरोप 'निवारा अभियान' तसेच 'कामगार संघटना संयुक्त कृती समिती'ने केला आहे. कमाल जमीन धारणा कायद्यामुळे १९९० पर्यंत मुंबईतील घरांच्या किमती परवडणाऱ्या होत्या. म्हाडाने त्या काळात स्वस्त व परवडणारी घरे मोठ्या प्रमाणात बांधली. मात्र आता म्हाडा घरेही सामान्यांच्या आवाक्याबाहेर आहेत. अशावेळी महानगर प्रदेश परिसरात दीड कोटी गरजू व गरिबांसाठी परवडणारी घरे निर्माण करण्यासाठी 'निवारा अभियान' स्थापन करण्यात आले आहे.

कमाल जमीन धारणा कायदा रद्द करण्यापूर्वी मुंबईतील सुमारे १००९ एकर भूखंड शासनाने अत्यंत अल्प किमतीत संपादन केला आहे. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातच ही माहिती आहे. या भूखंडावर निवारा अभियान हक्क सांगणार आहे, असे या 'अभियान'चे सरचिटणीस विश्वास उटगी यांनी सांगितले.

हे भूखंड शासनाने गरिबांच्या घरांसाठी उपलब्ध करून द्यावेत,



या न्यायालयाच्या आदेशामुळे हादरलेल्या विकासकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. याबाबत पुढील भूमिका ठरविण्यासाठी श्रीकृष्ण समिती नेमण्यात आली. या समितीने अहवाल देऊन हे भूखंड शुल्क आकारून देण्याचे सूचित केले. हा अहवाल सरकारने नोव्हेंबर २०१८ मध्ये मंत्रिमंडळात स्वीकारला. तसे आता सर्वोच्च न्यायालयापुढे सादर करून विकासकांना याचिका मागे घ्यायला लावण्यात येणार आहे.

## मुलाचा कॅन्सर बरा करतो सांगत भोंदूबाबाकडून महिलेवर बलात्कार, ३.५ लाखही लुटले

**मुंबई-** ट्रॉम्बे पोलीस सध्या उज्जैन येथील एका भोंदूबाबाचा शोध घेत आहेत ज्याने मुलाचा कॅन्सर बरा करण्याचा बहाणा करत चेंबूर येथील ४१ वर्षीय महिलेवर बलात्कार केला. इतकंच नाही तर त्याने दांपत्याकडून ३.५ लाख रुपये लाटले आहेत. कॅन्सरग्रस्त १० वर्षीय मुलाचा गतवर्षी मृत्यू झाला आहे. दांपत्याने पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. महत्त्वाचं म्हणजे दांपत्य उच्चशिक्षित असून पती शास्त्रज्ञ आहे. त्यांचा धार्मिक गोष्टींवर विश्वास आहे.

'२०१७ मध्ये मुलाला कॅन्सर असल्याचं निष्पन्न झाल्यानंतर दांपत्याला खूप मोठा धक्का बसला होता. मुलाला रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. पण मिळणाऱ्या उपचारांवर ते समाधानी नव्हते. मे २०१७ रोजी मुलाच्या आईची मंदिरात आरोपी बाबाशी भेट झाली. त्यांनी संपूर्ण घटनाक्रम त्याला सांगितला. आपण धार्मिक पद्धतीने उपचार करत आजार बरा करु शकतो अशी बतावणी त्याने यावेळी केली', अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

तक्रारीत दांपत्याने दिलेल्या माहितीनुसार, आरोपी भोंदूबाबा घरी आला असता त्याने यज्ञ केलं.



यावेळी त्याने महिलेला आणि मुलाला काही राख खाण्यासाठी दिली. ती खाल्ल्यानंतर दोघेही बेशुद्ध पडले. दोघेही शुद्धीत आले तेव्हा आरोपी भोंदूबाबा घरीच होता. हा उपचाराचा एक भाग होता असं सांगत महिलेकडून ६० हजारांचे दागिने घेऊन तो निघून गेला.

काही दिवसांनी आरोपीने पुन्हा एकदा महिलेशी संपर्क साधला आणि पुन्हा एकदा उपचार करणं गरजेचं असल्याचं सांगितलं. उपचार कसा केला जाऊ शकतो यासंबंधी बोलण्यासाठी त्याने महिलेला अंधेरी येथील फ्लॅटमध्ये बोलावलं. तिथे गेल्यानंतर आरोपीने हा उपचाराचा एक भाग असल्याचं सांगत महिलेवर लैंगिक अत्याचार केला. आरोपीने यावेळी व्हिडीओ रेकॉर्ड करत काही फोटोही काढले होते. यानंतर आरोपीने व्हिडीओ आणि फोटोंचा वापर करत महिलेला धमकावण्यास सुरुवात केली. तसंच सोशल मीडियावर अपलोड करण्याची धमकी देत महिलेकडून पैसे लाटण्यास सुरुवात केली. 'महिलेने पतीला यासंबंधी कोणतीही माहिती दिली नव्हती. आरोपीने महिलेच्या पतीलाही गंडवत उपचार करायचा असल्याचं सांगत २.९८ लाख रुपये लुटले.

## आधी 'लगीन' निवडणुकीचे



**नवी मुंबई- सार्वत्रिक निवडणुकीसाठी नेरुळचे आगरी कोळी भवन जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कामांसाठी आरक्षित केल्याने तब्बल ४० लग्नसोहळे अडचणीत आले आहेत. यामुळे कित्येक महिने धावपळ करून लग्नासाठी सभागृहे आरक्षित करणाऱ्या कुटुंबांना मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.**

नेरुळ येथील लग्नसोहळ्यांसह विविध कार्यक्रमांसाठी मोक्याचे असलेले आगरी कोळी भवन निवडणूक कामासाठी जिल्हा अधिकाऱ्यांनी आरक्षित केले आहे. यामुळे आता ऐनवेळी लग्नासाठी नवे सभागृह शोधण्यासाठी वधू-वराकडील मंडळींची धावाधाव सुरू आहे. निवडणुकीसाठी कोणतीही जागा तात्पुरती ताब्यात घेण्याचा जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार असला, तरी सहा-सहा महिन्यांपासून लग्नासाठी सभागृहे आरक्षित करणाऱ्यांचा 'ग्राहक' म्हणून काही अधिकार आहे की नाही, असाही प्रश्न विचारला जात आहे. सिडकोनिर्मिती आगरी कोळी महोत्सव ही नवी मुंबईतील महत्त्वाची वास्तू आहे. नेरुळ या मध्यवर्ती उपनगरात पामबीच मार्गालगत असल्याने येथे लग्नसोहळे, राजकीय मेळावे, सभा, सांस्कृतिक कार्यक्रम होतात. लग्नसोहळ्यासाठी सहा महिने अगोदरच सभागृह आरक्षित करावे लागते. त्याप्रमाणे आतापर्यंत येथे ४० लग्न सोहळे आरक्षित करण्यात आले होते. मात्र निवडणुकीच्या कामासाठी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी ही संपूर्ण वास्तू २० एप्रिल ते २५ मे पर्यंत आरक्षित केल्याचे पत्र सिडकोला पाठवले आहे. त्यामुळे लग्नघराची मंडळी चिंतेत पडली आहेत. सिडकोने याबाबत जिल्हाधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला होता. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणीही केली. मात्र याबाबत अद्याप भूमिका जाहीर न झाल्याने सर्व बुचकळ्यात पडले आहेत. याबाबत जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. या भवनात दुसऱ्या माळ्यावर लग्नासाठी प्रशस्त सभागृह आहे.



## 'मागेल तेथे रक्त' योजना मुंबईत बंद

**मुंबई- जे.जे.रुग्णालयातील महानगर रक्तपेढीच्या माध्यमातून मुंबईतील रक्तदात्यांना 'मागेल तेथे रक्त' पोहोचविणारी 'ब्लड ऑन कॉल' ही आरोग्य विभागाची महत्त्वाकांक्षी योजना मुंबईत बंद करण्यात आली आहे. याचा मोठा फटका मुंबईतील रुग्णांना बसत असून ही योजना पुन्हा सुरू करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.**


आरोग्य विभागाने २०१३ मध्ये सातारा येथे प्रायोगिक तत्त्वावर ही योजना सुरु केली होती. त्यानंतर ७ जानेवारी २०१४ पासून मुंबईसह संपूर्ण राज्यात 'ब्लड ऑन कॉल' योजना सुरु करण्यात आली होती. मोटर सायकलच्या माध्यमातून चाळीस किलोमीटर किंवा एक तासाच्या अंतरावरील रुग्णालयांना शीतसाखळीतून (कोल्ड चेन बॉक्स) रक्त वा रक्तघटक उफलब्ध करून देण्यात येत होते. यासाठी रक्त पिशवीच्या खर्चा व्यतिरिक्त १० किमी अंतरासाठी ५० रुपये व ११ ते ४० किमी अंतरासाठी १०० रुपये अतिरिक्त आकारण्यात येत होते. या योजनेची लोकप्रियता वेगाने वाढत होते. २०१७ पर्यंत १०४ या दूरध्वनी क्रमांकावर ४३,२४७ फोन आले व एकूण ३५,५२२ रक्ताच्या पिशव्यांचे रुग्णालयात जाऊन रुग्णांना वितरण करण्यात आले. गेल्या तीन महिन्यापासून मुंबईत अचानक ही योजना बंद करण्यात आल्यामुळे रक्त हवे असलेल्या शेकडो रुग्णांना रक्त मिळविण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. जे.जे. महानगर रक्तपेढीमधून मुबलक रक्त उपलब्ध होणे अपेक्षित आहे तेथील बहुतेक उपकरणे बंद पडली आहेत. दोन कोटी रुपये किमतीची दोन ऑटोमेशन मशिन गेली पाच वर्षे बंद असून रक्त गट तपासणी करणारी व क्रॉस मॅच करून देणारे सत्तर लाखाचे उपकरणही गेली काही वर्षे बंद आहे. याशिवाय एचआयव्हीची चाचणी करणारे एक एलआयझर मशिनही बंद आहे. सुमारे चाळीस हजार रक्तपिशव्या साठवणूक करण्याची क्षमता असलेल्या या रक्तपेढीत आज महिन्याकाठी केवळ अडीच हजार ते तीन हजार रक्ताच्या पिशव्या रक्तदानातून जमा होतात. याचाच अर्थ वर्षाकाठी सुमारे तीस हजार रक्तपिशव्या जमा केल्या जातात असे महानगर रक्तपेढीतील डॉक्टरांनी सांगितले. येथे काम करणाऱ्या डॉक्टरांना व तंत्रज्ञांना गेली अनेक वर्षे केवळ तीस हजार रुपये मानधन देण्यात येत असून आरोग्य विभागातील पूर्णवेळ डॉक्टरांना सुमारे साठ हजार तर तंत्रज्ञांना पन्नास हजार वेतन मिळत असल्यामुळे महानगर रक्तपेढीतील डॉक्टर व तंत्रज्ञ नैराश्याच्या गर्तेत सापडल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

या पार्श्वभूमीवर महानगर रक्तपेढीचे सक्षमीकरण व 'ब्लड ऑन कॉल' योजना पुन्हा सुरु करण्याची मागणी रक्तदान क्षेत्रातील सेवाभावी संस्थांनी केली आहे.

## मुंबईत मराठी शाळांमधील विद्यार्थी संख्येत साडेचार हजारांनी घट!

**मुंबई-** सेमी इंग्रजी वर्ग, स्पोकन इंग्रजीचे धडे, विद्यार्थ्यांना टॅब अशा अनेक आमिषांनंतरही मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मराठी शाळांना उतरती कळाच लागल्याचे दिसत आहे. गेल्या वर्षांच्या तुलनेत यंदा मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थी संख्येत साडेचार हजारांची घट झाल्याचे समोर येत आहे.

मराठी माध्यमाच्या शाळांपासून दुरावलेल्या पालक आणि विद्यार्थ्यांची



पावले पुन्हा शाळांकडे वळवण्यासाठी शासनाकडून वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न करण्यात येत असताना प्रत्यक्षात मुंबई महापालिकेच्या कक्षेतील मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थी संख्या झपाट्याने आटत आहे. विद्यार्थी टिकवून ठेवण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना यश मिळाले नसल्याचे पालिकेच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत (२०१७-१८) यंदा (२०१८-१९) मराठी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थी संख्येत साडेचार हजारांची घट झाली आहे. गेल्या वर्षी पालिकेच्या कक्षेत मराठी माध्यमाच्या ३१४ शाळा होत्या आणि एकूण ४२ हजार ५३५ विद्यार्थी शिक्षण घेत होते. यंदा शाळांची संख्या ३१० तर विद्यार्थ्यांची संख्या ३८ हजार ७०४ झाली आहे. विद्यार्थ्यांच्या गळतीचे हे प्रमाण ९ टक्के आहे. मराठी माध्यमाच्या शाळांच्या तुलनेत हिंदी आणि उर्दू माध्यमाच्या शाळांची परिस्थिती बरी आहे. या माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थीसंख्याही कमी होत असली तरी मराठी माध्यमापेक्षाही या माध्यमांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील गळतीचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे माहिती अधिकाराच्या माध्यमातून समोर आले आहे.

## युतीधर्म पाळण्यासाठी राणेंवर भाजपचा दबाव

**मुंबई- मी भाजपचा खासदार असलो तरी रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून आपले पुत्र निलेश महाराष्ट्र स्वाभिमान पक्षातर्फे निवडणूक लढवतील, असे माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी जाहीर केले असले तरी त्यांच्या मुलाने निवडणूक लढवू नये, यासाठी भाजपच्या नेतृत्वाने दबाव आणला आहे. यामुळे राणे कोणती भूमिका घेतात, याविषयी उत्सुकता आहे.**

दरम्यान, राणे यांची भूमिका लक्षात घेता हा मतदारसंघ राष्ट्रवादीला न सोडता काँग्रेसने आपला उमेदवार जाहीर केला आहे. राणे आणि शिवसेना यांच्यातून विस्तवही जात नाही. युती झाल्याने रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघ शिवसेनेकडे कायम राहणार, हे स्पष्ट झाले. युती झाल्यावर राणे यांनी, आपले पुत्र निलेश महाराष्ट्र स्वाभिमान पक्षातून लढतील, असे जाहीरही केले होते. राणे शिवसेनेच्या विरोधात लढतील हे लक्षात घेऊन काँग्रेस आणि राष्ट्रवादीने वेगळी चाल रचली. हा मतदारसंघ काँग्रेसकडे आहे. राणे आणि काँग्रेस यांचे संबंध लक्षात घेता राणेपुत्राला मदत करणे काँग्रेसला शक्य झाले नसते. यामुळेच हा मतदारसंघ राष्ट्रवादीला सोडावा आणि आघाडीने राणे यांच्या पुत्राला मदत करावी, अशी रणनीती होती.

राणे यांनी शिवसेनेच्या विरोधात उमेदवार उभा केल्यास त्यातून युतीत चुकीचा संदेश जाऊ शकतो. कारण राणे भाजपचे खासदार असून, ते पक्षाच्या जाहीरनामा समितीचे सदस्यही आहेत. राणे आणि शिवसेनेत सख्य होणे अशक्यच. पण त्यांनी मुलाला उभे करू नये, असा भाजपचा प्रयत्न आहे. या दृष्टीने भाजपने राणे यांच्यावर दबाव आणला आहे. भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वाने राणे यांना तसे बजावल्याचे समजते. राणे यांचे अलीकडचे, 'आपण भाजपप्रणीत रालोआचे सदस्य आहोत' हे विधान बोलके आहे याकडे भाजपनेते लक्ष वेधत आहेत. राणे ऐनवेळी माघार घेऊ शकतात, हे लक्षात घेऊनच काँग्रेसने नवीनचंद्र बांदिवडेकर यांची उमेदवारीही जाहीर केली. दरम्यान, राणेंना पाठिंबा देण्याचा प्रश्नच नव्हता, असे काँग्रेस खासदार हुसेन दलवाई यांनी स्पष्ट केले आहे.



पृष्ठ १ वरुन

### महाआघाडीतल्या ५६ पक्षांच्या पराभवासाठी...

आम्ही मांडलेले प्रश्न मुख्यमंत्र्यांनी मार्गी लावले आहेत, लोकसभेची ही लढाई नसून देशाचं संरक्षण करणारी आणि जे देशाचं संरक्षण कधीच करु शकले नाही यांच्यातील ही लढाई आहे, अशी टीका चंद्रकांत पाटलांची केली आहे. ज्या चार जागांच्या जोरावर शरद पवार देशात राजकारण करतात, त्यातली एकही जागा यावेळेस जिंकू देणार नाही, असं आव्हानही चंद्रकांत पाटलांनी दिलं.पश्चिम महाराष्ट्रातील दहाही जागा युतीच्या असतील. अजूनही वेळ गेलेली नाही, शरद पवारांनी जसा स्वतः पळ काढला, तसं मुलीला आणि नातवाला तरी का पुढे करताय, उमेदवारी अर्ज मागे घ्या, असं चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं.

### ज्योतिषाचे भाकीत;....

तर मावळमध्ये श्रीरंग बारणे आणि पार्थ पवार यांच्यात अटीतटीची लढत होणार असून कोण जिंकणार हे आत्ताच सांगता येणार नाही.माढा मतदारसंघात सर्व उमेदवारांची यादी जाहीर नसल्यामुळे तिथे कोण जिंकेल हे सांगता येणार नाही. जालनामधून कमी फरकाने का होईना रावसाहेब दानवे जिंकून येतील. राजू शेट्टी यांच्या दोन्ही जागा निवडून येतील असे राज्यातील काही महत्वाच्या लोकसभा मतदारसंघाचे निकाल असतील, असे भाकीत महाराष्ट्र ज्योतिष मंडळाचे अध्यक्ष ज्योतिषरत्न नंदकिशोर जकातदार यांनी व्यक्त केले. नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधान होणार असल्याचे भविष्य वर्तवले असले तरी भाजपला २०१४ प्रमाणे घवघवीत यश मिळणार नाही. सत्ता स्थापण्यासाठी घटक पक्षांचे सहकार्य घ्यावे लागणार असल्याचे जकातदार म्हणाले. शिवाय नव्याने स्थापन होणारे भाजपचे सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करु शकणार नाही. २०२२ मध्येच मध्यावधी निवणुकांना सामोरे जावे लागेल, असे आश्चर्यकारक भाकीत जकातदार यांनी व्यक्त केले.

## संपादकीय...

# लोकसभा निवडणुकीतील फटाके



संपादकः-
दिपक मोरेश्वर नाईक

निवडणूक - मग ती गल्लीतील असो की दिल्लीतील.. या काळात लवंगी फटाके, आपटबार, फुसका बार अशा फटाक्यांशी संबंधित गुणवैशिष्ट्यांची चर्चा आवर्जून होत असते. लौकिकार्थाने फटाके प्रत्यक्ष वाजवले की नाही यापेक्षा उमेदवाराच्या मागे फटाके कसे फोडले जातात, याची चर्चा अधिक मासलेवाईकपणे रंगते. निवडणुकीचा हंगाम सुरू झाला की इच्छुक मंडळी झपाटल्यागत कामाला लागतात. यातील बव्हंशी मंडळी आपल्या मागेपुढे पाठीराखे आहेत की नाहीत किंवा असले तरी त्यांची संख्या किती असू शकेल, याचा कुठलाही सारासार विचार न करता निवडणुकीची तयारी सुरू करतात. अशा इच्छुकांची संख्या ही प्रत्येक निवडणुकीमध्ये लक्षणीय असते. निवडणुकीच्या मोसमातील त्यांची वागण्या-बोलण्याची तऱ्हाच वेगळी असते. त्यामुळे अशा मंडळींकडून एक प्रकारे मतदारांचे मनोरंजन होत असते. पण, ज्या उमेदवारांना तिकीट मिळण्याची खात्री असते, ते एक किंवा त्याहून अधिक पंचवार्षिक कारकीर्द पूर्ण करतात. त्यामुळे अशा मोजक्या उमेदवारांकरवी




मतदारसंघाची बांधणी प्रत्यक्ष निवडणुकीच्या दोन-तीन वर्षे आधीच सुरू केलेली असते. या पार्श्वभूमीवर मतदारसंघात बैठकांच्या निमित्ताने येणाऱ्या पक्षनेतृत्वाकडून अशा विद्यमान उमेदवारांच्या नावांची घोषणा तर सोडाच, साधी चर्चादेखील होत नाही म्हटल्यावर अशांना मग गॅसवर असल्याचा अनुभव पदरी पडतो. याच काळात प्रतिस्पर्धी पक्षाकडून निव्वळ उमेदवारीची घोषणा झाली तरी फटाके वाजवण्याचे फर्मान कार्यकर्त्यांना सोडले जाते. त्यातही गंमत बघा, फटाके वाजवण्यासाठी दारात किती पाठीराखे आलेत याची मोजदाद करणे मुश्कील असते. पण शेवटी ते फटाकेच. वाजले अन् नाही वाजले तरी त्याच्यातील दारूगोळ्याचा दर्प परिसरात पसरतच असतो.

उपरोक्त नमूद केलेल्या सर्वच मुद्द्यांचा मथितार्थ एकच की, निवडणुकीत विजयी होण्याआधी वा विजयानंतर वाजणाऱ्या फटाक्यांसोबतच मतदानाच्या निकालापर्यंत प्रत्येक उमेदवाराच्या मागेपुढे वेगळ्या अर्थाने फटाके वाजतच असतात. नाशिक मुक्कामी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह दोन्ही पक्षांतील वरच्या फळीतील नेते येऊन गेले. दोघांनीही युतीतील प्रत्येक घटकाचे मनोमिलन होईल वा झाले नसेल तर ते कसे करायचे याचा पाठ पढवून गेले. परंतु, नाशिक वा दिंडोरी या दोन्ही प्रमुख मतदारसंघांतील उमेदवारीबाबत अवाक्षरही काढले नाही. त्यामुळे कार्यकर्ते प्रत्येक मुद्द्याचा अन्वयार्थ काढू लागलेत. स्वपक्षीय कार्यकर्तेच उमेदवारीबाबत उलटसुलट चर्चा करीत असतील तर हीदेखील उमेदवारांच्या दृष्टीने फटाकेबाजीच म्हणावी लागेल. याचे प्रमुख कारण, पक्षाकरवी जोवर उमेदवारीवर अधिकृत शिक्कामोर्तब होत नाही तोवर संभ्रम हा उमेदवाराला वेडापिसा करू लागतो. नाशिक व दिंडोरीच्या बाबतीत नेमके असेच घडते आहे. दिंडोरीमध्ये भाजपचे खासदार हरिश्चंद्र चव्हाण तसेच नाशिक मतदारसंघात हेमंत गोडसे यांच्या उमेदवारीला पक्षांतर्गत विरोध सुरू आहे. त्यामुळे दोहोंचीही उमेदवारी राहते की जाते याचीच चर्चा रंगू लागली आहे.

दोघांच्याही उमेदवारीवरून दावे-प्रतिदावे सुरू आहेत. याचे एक ज्वलंत उदाहरण म्हणजे, माजी महापौर दशरथ पाटील यांच्या निवडणुकीचे देता येईल. शिवसेनेच्या तत्कालीन नेतृत्वाने उमेदवारी दिली. त्यानुसार सुरुवातीच्या काळात जोरदार मोर्चेबांधणी झाली. उमेदवार निवडून येईल अशी चर्चादेखील सुरू झाली खरी; पण प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी पक्षांतर्गत उफाळून आलेल्या फंदफितुरीने घात केला. जवळपास विजयाच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या उमेदवाराला पराभव पत्करावा लागला. दबावाने कार्यकर्त्यांचे मनोमिलन करता येऊ शकते, पण त्यांची दुखावलेली मनं पूर्ववत जोडणं हे मोठ्या जिकिरीचं काम असतं. थोडक्यात काय तर असे दुखावलेल्या मनाचे कार्यकर्ते उमेदवाराच्या पाठीमागेही फटाक्याचीच भूमिका बजावत असतात. राष्ट्रवादीच्या पातळीवरदेखील फार वेगळे चित्र आजच्याघडीला दिसत नाही. नाशिकला समीर भुजबळ व दिंडोरीतून धनराज महाले यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा झाली. त्यामुळे अंमळ आधीच राष्ट्रवादीच्या समर्थकांनी फटाके फोडले. घोडामैदान तर अजून लांब आहे, पण फटाके तर फुटले गेलेत. एकुणात काय तर निवडणूक अन् फटाके यांचा अनन्यसाधारण संबंध आहे. लोकसभा निवडणुकीतही हिंदुत्व, राष्ट्रीयत्व, राष्ट्रवाद, प्रांतवाद, वंचितत्व, भावत्व अशा अनेक मुद्द्यांची घुसळण कितीही प्रमाणात केली गेली तरी मतदारांना वा समर्थकांकरवी कोणा ना कोणाच्या मागे फटाके हे वाजवले जाणारच आहेत. असा गमतीशीर हा फटाक्यांचा महिमा आहे.

# प्रदूषणाचे अदृश्य संकट



***भारतातील सर्व प्रमुख शहरे ही प्रदूषणाची गंभीर पातळी गाठून चिंताजनक बनली आहेत. परंतु, त्यावर उपाय करण्याचा कोणताही पर्याय समोर न येता आपण अज्ञानानेच या संहाराला सामोरे जाऊ, अशी स्थिती आली आहे...***

शहरीकरण हा अर्थव्यवनस्थेचा अनिवार्य घटक आहे. खेड्यात रोजगार मिळत नाही, शेतीचे उत्पन्न हाता तोंडाची गाठ पडण्याएवढेही नाही, अशा अवस्थेत प्रत्येकजण शहराकडे ओढला जातो. परंतु या शहरांमध्ये मृत्यूचा अदृश्य सापळा आहे आणि तो दिसत नाही. विविध प्रदूषणांनी ही शहरे पोखरली असून त्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन, 'जेव्हा कधी आपल्यावर येईल तेव्हा पाहू' असा स्वार्थी आहे आणि त्याची किंमत मोजावी लागणार आहे. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचा अहवाल हा 'प्रगती'च्या मागे लागलेल्या जनमानसाचे डोळे उघडणारा आहे. भारतातील प्रमुख शहरे ही प्रदूषणाची गंभीर पातळी गाठून आता चिंताजनक बनल्याचे हा अहवाल सांगतो. परंतु ह्याची गंभीर दखल घेऊन उपाय करण्याचा पर्याय समोर न येता हा अहवाल विस्मृतीत जाऊन आपण अज्ञानानेच ह्या संहाराला सामोरे जाऊ, अशी स्थिती आहे. याची भयावहता लक्षात येऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे आणि आपल्याला त्याचीही सवय झाली आहे.

ह्या संशोधकांनी २०१०च्या आकडेवारीवर केलेल्या अभ्यासाप्रमाणे आशियामध्ये तीन लाख लोक ह्या वायुप्रदूषणामुळे मृत्युमुखी पडतात. आपल्या फुफ्फुसात शिरलेले सूक्ष्म कण व ओझोनमुळे हे प्रमाण वाढले आहे. सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म अशा धूलिकणांमुळे व या धूलिकणांच्या फुफ्फुसांपर्यंत सहजपणे होणाऱ्या प्रवेशामुळे अर्धांगवायू, हृदयरोग आणि फुफ्फुसाचा कर्करोग होऊ शकतो. २०१२ साली केलेल्या मूल्यांकनानंतर वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO)च्या निष्कर्षाप्रमाणे घरातील व घराबाहेरील वायुप्रदूषणामुळे गेल्या वर्षी, सात लाख लोक हे सरासरी वयोमानाच्या अगोदर मृत्युमुखी पडले. आजवर भारतामध्ये सहा लाख पंचेचाळीस हजार अकाली मृत्यू हे केवळ हवेच्या प्रदूषणामुळेच झाले. याबाबत जागरूकता दिसत नाही. आपल्या परिसरातील हवेची गुणवत्ता सांगणाऱ्या फलकाची, आपल्या मोबाइलवर हवेच्या गुणवत्तेची माहिती देणाऱ्या ॲपची आवश्यकता यातून अधोरेखित होते. परंतु सकाळी धावताना किती उर्जा खर्च झाली, किती वजन घटले याचा हिशेब ठेवणाऱ्या ॲपएवढीच याचीही गरज आहे. हे सर्व प्रदूषण आशियात आणि मुख्यतः चीन, भारत व पाकिस्तानमध्ये असल्याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे आपले खनिज तेलावर व कोळशावर ऊर्जानिर्मितीसाठी असलेले अवलंबित्व. यातून अनिवार्यतेने प्रदूषण होणार हे माहिती असूनही मोठ्या प्रमाणावर झालेल्या ज्वलनक्रियेने हे सूक्ष्म कण हवेमध्ये पसरतात आणि या पुढे सूक्ष्म क्षेपणास्त्रांचे जीवघेण्या अस्त्रांमध्ये रूपांतर होते. यांच्यामुळे क्रयशक्ती व उपयोगिता कमी होते आणि प्रगतीवर व देशाच्या आर्थिक क्षमतेवर परिणाम होतो. शासनालाही त्याचे गांभीर्य कळत नाही. कळले तरी वळत नाही.

२.५ मायक्रॉनच्या सूक्ष्म धूलिकणांची निर्मिती ही मुख्यत: ग्रामीण भागात स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या शेणाच्या गोवऱ्या, लाकूड व इतर बायोमासच्या ज्वलनामुळे होते. केंद्र सरकारच्या बहुविध योजनांतून सर्वदूर गॅस पोहोचवून अशा मृत्यूंपासून ग्रामीण जनतेला वाचविण्याचे कामही होत आहे. तरीही स्वयंपाकासाठी प्रदूषण न करणारे इंधन म्हणून सोलरचा वापर होण्याची आवश्यकता आहे. यातल्या तांत्रिक आणि व्यावहारिक अडचणी सोडवण्याचे प्रयत्न व्हायला हवेत.

शेतीची कीटकनाशके व खते, अमोनियाच्या संयोगाने निर्माण होणारे अमोनिअम नायट्रेट व सल्फेटसारखी संयुगे, पशुपालनाच्या अवैज्ञानिक पद्धती यातून निर्माण होणारे ग्रीन हाऊस गॅसेस या सर्वांचाही हवेच्या प्रदूषणात मोठा वाटा आहे. ह्या सर्व प्रकारचे प्रदूषण मूलत: शेतकऱ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाशी संबंधित आहे. पारंपरिक पद्धतीने शेती करताना त्याला विज्ञान व संशोधनाची जोड देऊन आवश्यक ते बदल करण्याची लवचिकता शेतकऱ्यांनी दाखविणे आवश्यक आहे. तसेच कृषी विद्यापीठे व इतर संशोधन संस्थांमध्ये होणारे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून 'प्रदूषणाच्या' नावाखाली त्याची लूट न होता त्याच्या 'उत्पादनक्षमतेला' धोका न पोहोचवता प्रयोग करणाऱ्यांची साखळी उत्पन्न होणे आवश्यक आहे.

याशिवाय या प्रदूषणात भर घालतात ती मोठी शहरे आणि महानगरे. जगात सर्वाधिक प्रदूषणकारी शहरे आपल्याच देशात आहेत. मोठ्या व आधुनिक शहरांच्या - स्मार्टनेसची राक्षसी भूक भागवायला लागणारी वीजनिर्मिती करायला कोणतीही उपलब्ध व औद्योगिक नफादायक पद्धती वापरली तर ती प्रदूषणकारी ते अतिप्रदूषणकारी अशाच प्रकारात मोडते. शहरा-महानगरांमधील व त्या अंतर्गत चालणारी सर्व प्रकारची वाहतूक, मुख्यत: खनिज तेलाचा इंधन म्हणून वापर करणारी सर्व प्रकारची वाहतूक ही मोठ्या प्रमाणावर या प्रदूषणात भर घालत आहे आणि या नागरी वस्त्यांना जवळच असणारे औद्योगिक विभाग ही तर स्पर्धात्मक जगातील आवश्यकता आहे, असे आपले ठाम मत आहे. ह्या औद्योगिक प्रदूषणालाही योग्य प्रकारे नियंत्रित करण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न हे मात्र जनमताच्या व आर्थिक मुद्द्यांच्या जोरावर अनेकदा न्यायालयीन प्रक्रियांनीही नियंत्रित केले जातात आणि वायूप्रदूषण मुक्त होते.

जगाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्याची आपली स्पर्धा सुरू आहे आणि त्या स्पर्धेत आपण सर्व हिरिरीने सहभागी झालो आहोत पण ह्या स्पर्धेच्या जोशात त्या खेळाचे नियमही ओलांडून मिळवलेले तात्पुरते विजय हे आपल्याला आपल्या विनाशाच्या अधिक जवळ नेत आहेत, हे आपल्याला आज लक्षात येत नाही. WHOच्या अहवालाच्या निष्कर्षात औद्योगिक प्रदूषणाप्रमाणेच घरगुती ऊर्जानिर्मितीसाठी होणारे प्रदूषण नियंत्रित करण्यावरही भर दिला आहे आणि शेतजमिनीवरील प्रदूषणाकडेही आपले लक्ष वळवत आहे.

ग्रामीण आणि वनवासी भागामध्ये शिक्षणाच्या अभावामुळे परिणामकारक रसायने वापरणे व त्यांच्या उपयोगाचे प्रमाण यांच्या अज्ञानामुळे हवेतील ह्या घटकांच्या अस्तित्वाने मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाणही लक्षणीय आहे. याकडे वैज्ञानिक आणि कायदेनिर्मिती करणाऱ्या यंत्रणांचे लक्ष असणे आवश्यक आहे. अदृश्य अशा धूलिकणांनी आपल्या शरीरात श्वासाद्वारे प्रवेश केल्यावर आपली इतर मृत्यू येण्याची शक्यता तीन टक्क्यांनी वाढते, हृदयरोगात ती दहा टक्क्यांनी वाढते आणि धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तींमध्ये श्वसनविकारांनी मृत्यू येण्याची शक्यता २७ टक्क्यांनी वाढते हे 'एन्व्हायर्नमेंटल हेल्थ परस्पेक्टिव्ह' या संशोधन पत्रिकेमध्ये प्रकाशित झाले आहे.

एकूणच वायुप्रदूषणामध्ये आपल्या शहरांच्या नावाची वर्णी लागली आहे ही गोष्ट अत्यंत गंभीरपणे घेऊन आपण आपल्या जीवनपद्धतीमध्ये योग्य तो बदल आणण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू केले तर गुणोत्तर पद्धतीने वाढणाऱ्या या वायुप्रदूषणाच्या परिणामांचे निर्मूलन करून आपण चांगले जीवन जगू शकू. वैज्ञानिक संशोधनाने वाढलेले आपले आयुर्मान विज्ञानाच्या दुरुपयोगामुळे व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रदूषणाने आपणच कमी करत आहोत हे लक्षात घेतले तर प्रगती आणि पर्यावरणसहयोगी प्रगतीमधील फरक आपल्याला दृष्टिक्षेपात यायला सुरुवात होईल. सस्टेनेबल डेव्हलपमेंटची व्याख्या ही प्रत्येक देशाप्रमाणे, जनसमूहाप्रमाणे बदलत जात आहे. जगाची ही व्याख्या समान करण्याचा प्रयत्न करणे आणि अशा समस्येवर जागतिक उपाययोजना स्वीकारणे हेच या समस्येचे एकमेव उत्तर आहे.

# बेकायदा बांधकामे वाचवण्यासाठी लपाछपीचा खेळ, भाईदर पालिकेचा कारभार

**मीरा रोड - मीरा-भाईदरमध्ये मोठ्या प्रमाणात होणाऱ्या बेकायदा बांधकामांवर कारवाई टाळण्यासाठी नगररचना विभाग आणि प्रभाग अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवत आहेत. नगररचना विभाग बांधकाम अनधिकृत वा अधिकृत असल्याचे स्पष्ट करत नाही. तर, प्रभाग अधिकारीही नगररचना विभागाचा अहवाल आल्यावर कारवाई करू, असे पालूपद लावत आहेत. बेकायदा बांधकामांना संरक्षण देण्यासाठी पाठशिवणीचा खेळ चालवणाऱ्या**



**अधिकाऱ्यांवर कारवाई होत नसल्याने या खेळात पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून काही बडे लोकप्रतिनिधीही सहभागी असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.**

बेकायदा बांधकामांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी आयुक्त, अतिक्रमण विभाग, प्रभाग अधिकारी व नगररचना विभागाकडे होत असतात. स्थानिक लोकप्रतिनिधी, वजनदार नेत्यांपासून अधिकाऱ्यांचा आशीर्वाद असल्याने तक्रारी होऊनही ठोस कारवाई होत नाही. तक्रारदार जास्तच पाठपुरावा करू लागला की, प्रभाग अधिकारी मग नगररचना विभागाला पत्र पाठवून माहिती विचारतात. पण, नगररचना विभाग बेकायदा बांधकामाच्या कारवाईची बाब आपल्या अखत्यारित नसल्याचे उगाळून चोथा झालेले उत्तर अतिक्रमण विभागास टोलवतात. प्रभाग अधिकारीही नगररचनेकडून माहिती आली नसल्याचे पालूपद लावतात.

वास्तविक, नगररचना विभागाने माहिती देताना तक्रारीत नमूद बांधकाम अधिकृत की अनधिकृत आहे, याचा स्पष्ट अभिप्राय दिला पाहिजे. पण, तसे होत नाही. तर, प्रभाग अधिकाऱ्यासही बांधकामधारकास नोटीस बजावणे, कागदपत्रे मागवणे, सुनावणी घेऊन निर्णय देणे, कारवाई करण्याचे अधिकार असूनही बेकायदा बांधकाम वाचवण्यासाठी नगररचना विभागाकडे बोट दाखवले जाते.

वरिष्ठांकडूनही प्रभाग अधिकारी आणि नगररचना अधिकाऱ्यांना पाठीशी घातले जाते. बेकायदा बांधकामांमध्ये आर्थिक उलाढाल होत असल्यानेच लोकप्रतिनिधींपासून अधिकारी ठोस कारवाई करत नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते कृष्णा गुप्ता यांनी केला आहे.

काशिमीरा येथील अग्रवाल ग्रीन व्हिलेज वसाहतीमध्ये आठ बेकायदा गाळे बांधण्यात आल्याची तक्रार ऑक्टोबरपासून चार वेळा सरकारपर्यंत केली गेली. पण, प्रभाग अधिकारी चंद्रकांत बोरसे यांनी नगररचना विभागाचा अहवाल आल्यानंतर कारवाई केली जाईल, अशी उत्तरे दिली. तक्रारदाराने पाठपुरावा केल्यावर बोरसे यांनी पाच महिन्यांनी म्हणजे २७ फेब्रुवारीला नोटीस बजावण्याचे काम प्रस्तावित असल्याचे लेखी उत्तर दिले. नगररचनाकार हेमंत ठाकूर यांनीही आपली जबाबदारी नसल्याचे सांगत तक्रार अर्ज अतिक्रमण विभागाकडे ढकलून दिला. सामान्य नागरिकांसाठी तर पालिका कार्यालये आणि त्यातील अधिकारी छळछावणीपेक्षा वेगळे नाहीत, असे तक्रारदारांचे म्हणणे आहे. आयुक्त बालाजी खतगावकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

# नालासोपारा विधानसभा सभेत कोकणी मतदारांचे प्राबल्य, बहुजन विकासच्या राजकारणाचे युतीपुढे आव्हान

**पारोळ** - नालासोपारा मतदारसंघातील मनवेल पाडा-कारगिलनगर या भागात कोकणी वोट बँक असून आगामी लोकसभा निवडणूकीमध्ये या विधानसभा मतदार संघातून कोणता पक्ष आघाडी घेईल हे कोकणी मतदारांवर अवलंबून असणार आहे.



मुंबईमध्ये राहणारा चाकरमानी गेल्या पंधरा वर्षांपासून वसई-विरारमध्ये मोठ्या प्रमाणात स्थायिक झाला आहे. साहजिकच या कोकणी मतांचा मोह कोणत्याही पक्षाला व्हावा. वसई-विरार शहरात बहुजन विकास आघाडीची सत्ता आहे. सत्ता स्थापनेत प्रत्येक मोठ्या पक्षाला बहुजन विकास आघाडीच्या तीन आमदारांचे समर्थन राहिले आहे. परिणामी वसईत या मित्रपक्षाला कोणीही बाधा पोहोचवली नव्हती. त्यामुळे बहुजन विकास आघाडीनेही एक-दोन मतपेढी सोडल्या तर सगळ्यांना गृहीतच धरले होते.

मागील लोकसभा पोटनिवडणूक मात्र या सगळ्याला अपवाद ठरली. या निवडणुकीत भाजप-शिवसेना एकमेकांविरोधात उभे ठाकल्याने आणि ही लढाई दोन्ही पक्षांसाठी अहंकाराची ठरल्याने बहुजन विकास आघाडीची आपल्याच घरात कोंडी झाली. अपेक्षेप्रमाणे राज्यात सत्ता असलेल्या भाजपने प्रतिष्ठेची करून ही, लोकसभा पोटनिवडणूक जिंकली. तेव्हापासूनच या भागात विशेष महत्त्व प्राप्त झाले. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाने कोकणी मतांचे महत्त्व ओळखून बविआच्या वॉर्डात हळदी-कुंकू आणि कोकण मेळाव्यांचे आयोजन या वर्षी केले होते त्यातून बविआला शह देण्याचा प्रयत्न केला होता. मनवेलपाडा-कारगिलनगर हा भाग मागील निवडणुकीत बहुजन विकास आघाडीचा बाल्लेकिल्ला राहिला आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत याच भागातून बविआने मताधिक्क्यात आघाडी घेतली होती. तर महापालिका निवडणुकीत या भागाचे तब्बल पाच प्रभागांत विभाजन झाले होते. या पाचही प्रभागांतून बहुजन विकास आघाडीचे नगरसेवक कोकणी माणसाच्या मतांवर निवडून आले होते. मागील पाच वर्षांत मनवेलपाडा-कारगिलनगर भागाची लोकसंख्या लाखाच्या घरात गेली आहे. हा संपूर्ण भाग कोकणबहुल लोकवस्तीचा आहे. २०१४ च्या निवडणुकीत या भागात २० हजारच्या आसपास नोंदणीकृत मतदार होते.

# ठाणे स्थानकात रिक्षाचालकांची मुजोरी

*अवाच्या सवा भाडे आकारणी; वाहतूक पोलिसांकडे तक्रारींचा पाऊस*

**ठाणे रेल्वे स्थानक परिसरात रिक्षाचालकांच्या बेशिस्त वर्तनाचा कहर झाला आहे. रांग सोडून स्थानकाच्या प्रवेशद्वारावरच रिक्षा उभ्या करणे, मीटरनुसार भाडे आकारण्याऐवजी अवाच्या सवा भाडे आकारणे नित्याचेच झाले आहे. वाहतूक पोलिसांचेही यावर नियंत्रण नसल्यामुळे रिक्षाचालकांना मोकळे रान मिळाले आहे.**



ठाणे रेल्वे स्थानक परिसरात सॅटिसखाली महापालिकेने रिक्षाचालकांना रांगा आखून दिल्या आहेत. या रांगांवर नियंत्रण असावे यासाठी या ठिकाणी वाहतूक शाखेची चौकीही उभारण्यात आली होती. काही कारणांमुळे ही चौकी अन्यत्र हलवण्यात आली. याचा गैरफायदा आता मुजोर रिक्षाचालक घेऊ लागले आहेत. थांब्यांवर कुणाचेही नियंत्रण नसल्याने सायंकाळी गर्दीच्या वेळेत प्रवाशांची अक्षरश ससेहोलपट होते. अनेक रिक्षाचालक आपल्या रांगा सोडून स्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ रिक्षा उभ्या करतात आणि प्रवाशांना कुठे जायचे आहे, हे विचारतात.

घोडबंदर, कळवा, विटावा भागात जाणाऱ्या नवख्या प्रवाशांना हे रिक्षाचालक दुप्पट पैसे आकारत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. नवख्या प्रवाशाकडून घोडबंदरसारख्या भागात येण्यासाठी १५० ते २०० रुपये आकारले जात आहेत. या ठिकाणी जाण्यासाठी मीटरने ६० ते ७० रुपये होतात. तसेच शेअरिंग रिक्षाचालकही प्रवाशांच्या येण्या-जाण्याच्या मार्गावर वेडय़ावाकडय़ा पद्धतीने रिक्षा उभ्या करतात. अनेकदा हे रिक्षाचालक ट्रॅफिक वॉर्डनलाही दमदाटी करतात. त्यामुळे स्थानक परिसरात रिक्षाचालकांची दहशत पसरली आहे. इतक्या मोठय़ा प्रमाणात प्रवाशांची लूट होत असताना वाहतूक पोलीस आणि आरटीओकडून बघ्याची भूमिका घेतली जात आहे.

काही दिवसांपूर्वी स्थानिक नगरसेवक संजय वाघुले यांनी या मुजोर चालकांविरोधात एकदिवसीय आंदोलन केले होते. त्यानंतरही स्थिती जैसे थे असल्यामुळे प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

पोलिसांच्या ट्विटर खात्यावरही या ढिसाळ कारभाराचे नागरिकांकडून वाभाडे काढले जात आहेत. पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांनी 'आम्ही वाहतूक व्यवस्था सर्वाधिक मजबूत करू' असे सांगितले होते. मात्र ट्विटरवर नागरिकांच्या तक्रारी पाहून अद्यापही वाहतूक व्यवस्थेत सुधारणा झाल्याची चिन्हे नाहीत.

### पोलीस गायब

**उपायुक्त अमित काळे यांनी दोन-अडीच महिन्यांपूर्वी सॅटिसखाली रिक्षाचालकांवर वचक रहावा म्हणून एक पोलीस अधिकारी आणि तीन पोलीस कर्मचारी नेमले जातील, अशी घोषणा केली होती. प्रत्यक्षात तसे झालले नाही. या संदर्भात ठाणेनगर वाहतूक शाखेच्या पोलीस अधिकाऱ्यांना कारवाई करण्यास सांगितले जाईल, असे साहाय्यक पोलीस आयुक्त अनिल संकपाळ यांनी सांगितले.**

# कल्याणमध्ये पोलीस आणि शिवसैनिकांत झाली शाब्दिक चकमक

**कल्याण :** पुलवामा दहशतवादी हल्ल्यासंदर्भात साकारलेला शिवकालीन सर्जिकल स्ट्राइकचा देखावा शिव जयंतीच्या मिरवणुकीत सहभागी केल्यास आचारसंहितेचा भंग होऊ शकतो. त्यामुळे कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी नोटीस महात्मा फुले पोलिसांनी विजय तरुण मंडळाचे व्यवस्थापक विजय साळवी यांना बजावली होती. त्यानंतरही पोलिसांनी रामबाग ते आंबेडकर उद्यानापर्यंतच हा देखावा नेण्याची परवानगी दिली. मात्र, आंबेडकर उद्यानाजवळ मिरवणूक येताच संपूर्ण मिरवणुकीत हा देखावा असेल, असा आग्रह साळवी यांनी धरल्याने पोलीस व शिवसैनिकांत वादंग झाला. यावेळी शिवसैनिकांनी 'जय भवानी जय शिवाजी'च्या जोरदार घोषणाही दिल्या. अखेरीस हा देखावा संपूर्ण मिरवणुकीत होता.

रामबाग शिवसेना शाखेने शिवकालीन सर्जिकल स्ट्राइकचा देखावा तयार केला होता. शिवाजी महाराजांनी पुण्याच्या लाल महालात शाहिस्तेखानाची बोटे छाटली होती. त्यानंतर, पळून गेलेला शाहिस्तेखान पुन्हा महाराष्ट्रावर कधीही चाल करून आला नाही. शिवाजी महाराजांनी केलेले अनेक शिवप्रताप हे गनिमी कावा होते, हे या देखाव्यात दाखवण्यात आले होते. जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने भारतीय सैन्यावर केलेल्या



हल्ल्यात ४६ जवान हुतात्मा झाले. या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी हवाई दलाने पाकिस्तानात जाऊन एअर सर्जिकल स्ट्राइक केला. त्यानंतरही पाकिस्तानाकडून आपले सैनिक मारले जात आहेत. त्यामुळे पाकिस्तानला कायमचे उत्तर देण्यासाठी युद्ध पुकारले जावे, अशी मागणीही या देखाव्यात करण्यात आली होती.

याप्रकरणी महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश लोंढे यांनी साळवी यांना नोटीस बजावली. त्यात आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजी घ्यावी, अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा दिला होता. त्यानंतरही पोलिसांनी रामबाग ते आंबेडकर उद्यानापर्यंतच हा देखावा नेण्याची परवानगी दिली. त्यानुसार, आंबेडकर उद्यानानजीक देखावा पोहोचताच साळवी यांनी संपूर्ण मिरवणुकीत देखावा नेण्याचा आग्रह धरला. त्यामुळे पोलीस व शिवसैनिकांत वाद झाला.

# भाजपकडून मागून घेतलेल्या पालघर जागेवर सेनेने उमेदवारी जाहीर का केली नाही?

**मुंबई- शिवसेनेने आपल्या विद्यमान १८ खासदारांपैकी १७ खासदारांना उमेदवारी पुन्हा दिली आहे. एका खासदाराला डच्चू दिला आहे. या खासदाराबाबत नाराजी असल्याने उमेदवारी देण्यात आलेली नाही, असे सांगितले जात आहे. त्याचवेळी भाजपकडून मागून घेतलेल्या पालघर लोकसभा जागेवर शिवसेनेने आपला उमेदवार जाहीर केलेला नाही. त्यामुळे याची चर्चा सुरु झाली आहे. पालघरमधून दिवंगत वनगा यांच्या मुलाला उमेदवारी देण्याची घोषणा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली होती.**



पोटनिवडणुकीत शिवसेना आणि भाजप अशी थेट लढत झाली होती. यावेळी शिवसेनेने जोरदार लढत दिली होती. पराभवानंतर उद्धव यांची मतदारांच्या आभारासाठी सभा झाली त्यावेळी पुढेच उमेदवार हे श्रीनिवास वनगाच असतील असे जाहीर केले. मात्र, पहिल्या यादीत पालघरची उमेदवारी जाहीर करण्यात आलेली नाही. तसेच उस्मानाबाद मतदार संघामधून विद्यमान खासदार रवी गायकवाड यांना डच्चू देण्यात आला असून या जागेवरून ओमराजे निंबाळकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. शिवसेनेने प्रलंबित राहिलेली पालघरची जागा भारतीय जनता पक्षाकडून मागून घेतली आहे. या जागेवरील उमेदवार निश्चित झालेला नसला, तरी इथून श्रीनिवास वनगा यांना उमेदवारी मिळेल का याची उत्सुकता आहे.. याबरोबरच माथाडी कामगार नेते नरेंद्र पाटील हे साताऱ्याच्या जागेवरून भाजपतर्फे लढण्याच्या तयारीत होते. मात्र ही जागा शिवसेनेकडे आल्याने पाटील यांच्या उमेदवारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याच जागेवरून इच्छूक असललेले पाटील यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेटही घेतली. या भेटीनंतर पाटील हे शिवसेनेत जाणार अशीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

पालघरची जागा ही भाजपने आधीच्या लोकसभा निवडणुकीत जिंकली होती. तसेच पोटनिवडणुकीतही बाजी मारली होती. तसेच या ठिकाणी बविआ निवडणूक रिंगणात उतरणार आहे. राष्ट्रवादी आणि काँग्रेस बविआच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याची शक्यता आहे. प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन विकास आघाडीही पाठिंबा देण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथे निवडणूक रिंगणात युती विरोधात सर्व पक्ष असे चित्र दिसण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणताही धोका नको, याची चाचपणी सुरु आहे. तर साताऱ्यात राष्ट्रवादीचे तगडे उमेदवार उदयनराजे भोसले आहेत. ते विद्यमान खासदार आहेत. त्यांच्यासमोर आता शिवसेनेचा उमेदवार असणार आहे. कारण ही जागा शिवसेनेला गेली आहे. या ठिकाणाहून भाजपने निवडणुकीची तयारी केली होती.

# ...तर महाराष्ट्रात एकही शेतकरी आत्महत्या करणार नाही; गडकरींचा दावा

**नागपूर-** लोकांना स्वप्ने दाखविणे खूप सोपे आहे, जनता खूश होते; मात्र ही स्वप्ने पूर्ण न केल्यास जनता नाराज होते असे सांगत भाजपाचे नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी भविष्यात महाराष्ट्रात एकही शेतकरी आत्महत्या करणार नसल्याचा दावा केला आहे. लोकमतचे नागपूर निवासी संपादक गजानन जानभोर यांनी नितीन गडकरी यांनी मुलाखत घेतली. यावेळी गडकरी यांनी नागपूरला जगातील सर्वात सुंदर शहर बनविण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच मी आवाक्याबाहेर लोकांना स्वप्ने दाखविली परंतू त्या स्वप्नांपेक्षा जास्त कामे केली. स्वप्ने कधी संपत नाहीत. एका मागोमाग एक पडत राहतात. यामुळे लोकांना स्वप्ने दाखविणे खूप सोपे आहे, जनता खूश होते; मात्र ही स्वप्ने पूर्ण न केल्यास जनता नाराज होते असे गडकरी यांनी सांगितले. याचबरोबर महाराष्ट्राला विविध जलसिंचन प्रकल्पांसाठी १ लाख कोटी रुपये दिले आहेत. २० हजार कोटी बळीराजा योजना, ५० टक्क्यांपेक्षा जास्त काम पूर्ण



होऊनही बंद पडलेल्या १०८ प्रकल्पांना निधी दिला, प्रधानमंत्री सिंचाई प्रकल्प २६ प्रकल्पांना असे मिळून ४० हजार कोटी दिले आहेत. तर तापी-नार-नर्मदा, दमनगंगा-पिंजर या दोन नद्याजोड प्रकल्पांना ६० हजार कोटींचा निधी दिला आहे. यामुळे गोदावरी डॅम पूर्ण भरेल. यामुळे सह्याद्रीच्या पठारावरून समुद्रात जाणारे पाणी मराठवाड्याला, जायकवाडी धरणाला मिळेल. जायकवाडी ८० टक्के भरणार आहे.

# निरुपम यांच्या उमेदवारीचा अंतिम निर्णय आता राहुल गांधी घेणार

**मुंबई- मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष संजय निरुपम यांच्या उमेदवारीचा अंतिम निर्णय आता काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल गांधी घेणार आहेत. उत्तर पश्चिम लोकसभा मतदार संघातून संजय निरुपम यांना उमेदवारी देण्यास देवरा व कामत गटाचा कडाडून विरोध आहे. निरुपम यांना येथून तिकीट देऊ नये अशी भूमिका माजी केंद्रीय राज्यमंत्री मिलिंद देवरा यांनी घेतली असून त्यांनी दक्षिण मुंबईतून त्यांचा प्रचार गेले ५ दिवस थांबवलेला आहे.**

काँग्रेसच्या राष्ट्रीय निवडणूक समितीचा देखील निरुपम यांच्या नावाला विरोध आहे. या समितीतील अहमद पटेल, के. सी, वेणूगोपाळ,आणि काँग्रेसचे प्रभारी मल्लिकार्जुन खर्गे यांनी देखील मुंबई काँग्रेसमधून निरुपम यांना तिकीट देण्यास काँग्रेसमधील अंतर्गत विरोध असल्याचा अहवालत्यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल गांधी यांना दिला आहे. तर येथून काँग्रेसचे माजी मंत्री कृपाशंकर सिह यांच्या उमेदवारीच्या नावाला येथून पसंती दिली आहे. त्यामुळे निरुपम यांच्या उमेदवारीबाबतचा काँग्रेसच्या राष्ट्रीय निवडणूक समितीचा अहवाल राहुल गांधी यांनी राखून ठेवला असून निरुपम यांना उत्तर पश्चिम लोकसभा मतदार संघातून उमेदवारी द्यायची की, त्यांना परत त्यांच्या



पूर्वीच्या उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातून उमेदवारी द्यायची याबाबत अंतिम निर्णय राहुल गांधी घेणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी लोकमतशी बोलताना दिली.

दिल्लीत काँग्रेसच्या राष्ट्रीय निवडणूक समितीची बैठक झाली. यावेळी महाराष्ट्रातील ५ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली. मात्र मुंबईतील उत्तर पश्चिम व उत्तर मुंबई या दोन लोकसभा मतदार संघातील काँग्रेसच्या उमेदवारांचा तिढा सुटलेला नाही. त्यामुळे राहुल गांधी यांनी निरुपम यांच्या उमेदवारीचे सर्व अधिकार आपल्याकडे घेतले असून याबाबत त्यांना उत्तर पश्चिम लोकसभा मतदार संघातून की उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातून उमेदवारी द्यायची की नाही याचा अंतिम निर्णय राहुल गांधी घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# या १२ घराण्यांच्या अवतीभोवतीच फिरत असते महाराष्ट्राची सत्ता

**मुंबई-** महाराष्ट्र हे देशाचे असे राज्य आहे, जेथे सर्वात जास्त राजकारण्यांची कुटुंबे सक्रिय आहेत. डेमोक्रॅटिक वंशवादाच्या दुसऱ्या भागात आज वाचा या १२ दिग्गज कुटुंबांशी संबंधित ४३ चेहऱ्यांबाबत. पवार, ठाकरेंपासून चव्हाण, पाटीलपर्यंत... या कुटुंबांच्या अवतीभोवतीच महाराष्ट्राची सत्ता फिरत असते. अनेक दशकांपासून यातील काही कुटुंबांचे किती तरी जागांवर वचस्व आहे. यावरून त्यांचा दबदबा व मानाचा अंदाज लावता येऊ शकतो. जसे- बारामती... ही जागा २७ वर्षांपासून पवार कुटुंबाकडेच आहे.



**पवार ४ पिढ्या:** शारदाबाई : १९३६मध्ये पुणे लोकल बोर्डाच्या सदस्या.

**पुत्र: शरद पवार :** ३८ व्या वर्षी शरद पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. चारदा मुख्यमंत्री. स्वत:चा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. यूपीएत मंत्री होते.

**नातू : अजित पवार :** शरद पवारांचे पुतणे अजित पवार हे उपमुख्यमंत्री होते. बारामतीतून आमदार.

**नात :** सुप्रिया सुळे : २००६ मध्ये राज्यसभा सदस्य, तर २००९ व २०१४ मध्ये बारामतीतून खासदार बनल्या.

**पणतू :** रोहित-पार्थ : शरद पवारांचे नातू राजकारणात सक्रिय. या वेळी निवडणूक लढवणार. शिवसेनेचे जसे मुंबईत आहे तसेच या कुटुंबाचे बारामतीत वर्चस्व.

**ठाकरे ३ पिढ्या:** बाळासाहेब ठाकरे : १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना.

**पुत्र: उद्धव ठाकरे:** नातू : आदित्य ठाकरे : शिवसेनेच्या युवा सेनेचे अध्यक्ष. शिवसेनेत क्रमांक दोनचे पद.

ठाकरे कुटुंबाचे घर 'मातोश्री' चा आदेशच मुंबईत अंतिम मानला जातो. त्यांच्या मंजुरीविना या शहरात कोणताही अधिकारी राहू शकत नाही इतका दरारा. सध्या शिवसेनेचे अध्यक्ष. हे कुटुंब राजकारणात सक्रिय; परंतु ठाकरे कुटुंबातून कुणीही कोणतीही निवडणूक लढले नाही.

**पुतण्या : राज ठाकरे :** रोखठोक व करारी स्वभाव. शिवसेनेत मतभेदानंतर स्वत:चा पक्ष मनसेची स्थापना.

**मुंडे कुटुंब २ पिढ्या :** गोपीनाथ मुंडे: भाजपचे दिग्गज दिवंगत नेते. महाराष्ट्राचे गृहमंत्री होते. केंद्रात मंत्री झाले. मोठी मुलगी पंकजा महाराष्ट्रात कॅबिनेट मंत्री आहेत. दुसरी मुलगी प्रीतम बीडच्या खासदार. पुतण्या धनंजय विधान परिषदेत राष्ट्रवादीच्या विधिमंडळ पक्षाचे नेते आहेत.

**खडसे कुटुंब २ पिढ्या:** एकनाथ खडसे: भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री. खडसेंची पत्नी मंदा जिल्हा दूध संघाच्या अध्यक्षा, मुलगी रोहिणी जळगाव जिल्हा बँक अध्यक्ष. खडसेंची सून रक्षा खडसे रावेरमधून लोकसभेच्या विद्यमान खासदार आहेत.

**चव्हाण कुटुंब २ पिढ्या:** शंकरराव: काँग्रेसतर्फे दोनदा मुख्यमंत्री. आधी १९७५, नंतर १९८६ मध्ये. केंद्रात अर्थ आणि गृहमंत्री होते. मुलगा अशोक चव्हाणही मुख्यमंत्री राहिले आहेत. अशोक यांची पत्नी अमिता आमदार राहिल्या आहेत. सध्या नांदेडसाठी त्यांची चर्चा आहे.

**निलंगेकर ३ पिढ्या:** शिवाजीराव निलंगेकर १९८५-८६ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. काँग्रेसचे दिग्गज नेते. त्यांचा मुलगा दिलीप आमदार होते. सून रूपाताई खासदार होत्या. नातू संभाजी सध्या राज्यातील भाजप सरकारमध्ये मंत्री आहेत.

**भुजबळ कुटुंब २ पिढ्या:** छगन चंद्रकांत भुजबळ: बाळासाहेब ठाकरेंमुळे प्रभावित होऊन शिवसेनेत दाखल. १९८५ मध्ये मुंबईचे महापौर. नंतर राष्ट्रवादीत गेले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री राहिले आहेत. मुलगा पंकज आमदार आहेत. पुतण्या समीर २००९ मध्ये खासदार होते.

**मोहिते पाटील ३ पिढ्या:** शंकरराव १९५२ ते १९७२ पर्यंत सक्रिय. ४ वेळा आमदार होते. मुलगा विजयसिंह राष्ट्रवादीचे दिग्गज नेते. उपमुख्यमंत्रीही होते. त्यांचे भाऊ प्रताप भाजप खासदार होते. विजयसिंहांचा मुलगा रणजीत हे राज्यसभा खासदार होते.

**विखे कुटुंब ३ पिढ्या:** बाळासाहेब विखे पाटील: बाळासाहेब सात वेळा अहमदनगर उत्तरमधून जिंकले. केंद्रात मंत्री होते. मुलगा राधाकृष्ण महाराष्ट्रात विरोधी पक्षनेते. राधाकृष्ण यांची पत्नी शालिनी अहमदनगरच्या जि. प. अध्यक्ष. मुलगा सुजय यंदा लोकसभेच्या मैदानात आहेत.

**वसंतदादा पाटील ३ पिढ्या:** १९७७ ते ७८ मुख्यमंत्री होते. १९८३ ला पुन्हा सीएम. पत्नी शालिनीताई कॅबिनेट मंत्री होत्या. १९८० मध्ये खासदार झाल्या. मुलगा प्रकाश २००९ च्या आधी सांगलीचे खासदार होते. दादांचे नातू प्रतीक २००९ मध्ये सांगलीचे खासदार.

**देशमुख २ पिढ्या :** विलासराव मुख्यमंत्री होते. मुलगा अमित आमदार.

**कदम २ पिढ्या:** पतंगराव महाराष्ट्रात मंत्री होते. मुलगा विश्वजीत युकाँ अध्यक्ष

# राहुल गांधी देशाची माफी मागा

**नवी दिल्ली-** विदेश काँग्रेस कमिटीचे प्रमुख सॅम पित्रोदा यांनी पुलवामा हल्ल्यावरून केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर भारतीय जनता पक्षाला लोकसभा निवडणुकीत आयते कोलीत मिळाले आहे. भाजप अध्यक्ष अमित शहा यांनी काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी देशाची आणि जवानांची माफी मागावी अशी मागणी केली आहे.



पुलवामासारखे हल्ले होतच असतात असे अत्यंत वादग्रस्त विधान सॅम पित्रोदा यांनी केले होते. काँग्रेसने त्यांच्या विधानापासून फारकत घेतली होती. अमित शहा यावेळी म्हणाले की, जेएनयूमध्ये देशाविरोधात नारेबाजी होते तेव्हा काँग्रेस त्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा दर्जा देते आणि पुलवामा सारख्या हल्ल्यानंतर जेव्हा एअर स्ट्राईकने उत्तर दिले जाते तेव्हा त्याचे पुरावे मागितले जातात. ही किती दुर्दैवी घटना आहे. अमित शहा म्हणाले, की विधानापासून फारकत घेऊन काही होणार नाही. काँग्रेसच्या विदेश विभागाचे सॅम पित्रोदा यांचे विधान अनेक चिंतांना जन्म देणारे आहे. दहशतवादी घटनांसाठी पाकिस्तानला जबाबदार धरता की नाही? हे राहुल यांनी स्पष्ट करावे. दहशतवाद संपविण्यासाठी धोरण काय आहे हे सुद्धा स्पष्ट करावे. राहुल गांधी यांनी या प्रकरणावर तत्काळ माफी मागितली पाहिजे. पित्रोदा यांच्या वक्तव्याने शहीद कुटुंबियांचा अनादर झाला असल्याने राहुल यांनी माफी मागण्यास विलंब करता कामा नये, असे शहा म्हणाले.

# भाजपच्या चिन्हावर लढणार नाही -महादेव जानकर

**पुणे-** भाजप आम्हाला त्यांच्या चिन्हावर लढण्याची विनंती करत असेल तर ती आम्हाला मान्य नाही. तसे केल्यास ही युती नाही, तर बेकी ठरेल अशी टीका राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी केली. पुण्यामध्ये शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता मेळाव्यामध्ये जानकर बोलत होते. जानकर यांनी पुण्यामध्ये आज कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली.



यावेळी जानकर म्हणाले, इतक्या दिवसानंतर युती संदर्भात मुख्यमंत्र्यांकडून संपर्क करण्यात आला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून लवकरच निर्णय जाहीर करू. मात्र, युती आणि आघाडीकडून आम्हाला आमच्या पक्षाऐवजी त्यांच्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढण्याचा आग्रह केला जात आहे. त्यामुळे कदाचित या माध्यमातून आम्हाला व्यवस्थेतून बेदखल करण्याचा प्रयत्न केला जात आहे की काय? अशी शंका असल्याचे ते म्हणाले.


त्याप्रमाणेच कुल यांच्या उमेदवारी संदर्भात मी विचार करत आहोत. त्यासंदर्भातही लवकरच भूमिका स्पष्ट करणार असल्याचे राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी यावेळी सांगितले.

# महाआघाडीचं अखेर २६-२२ वर जमलं; विखेंची पत्रकार परिषदेला दांडी

**मुंबई-** लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस, राष्ट्रवादी महाआघाडीचे जागावाटप अखेर ठरले आहे. यामध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी प्रत्येकी २६-२२ जागांवर लढणार आहेत. तर दोन्ही पक्ष आपल्याकडील दोन-दोन जागा मित्रांसाठी सोडणार आहेत. यामध्ये राजू शेट्टींच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेला २ तर बहुजन वंचित आघाडीला १ आणि उर्वरित एक जागा ही अपक्ष आमदार रवी राणा यांची पत्नी नवनीत कौर यांना सोडण्यात आली आहे. जागावाटप ठरल्यानंतर मुंबईत महाआघाडीची संयुक्त पत्रकार परिषद झाली. यावेळी काँग्रेस, राष्ट्रवादीसह आघाडीतील इतर पक्षांची नेतेमंडळी उपस्थित होती. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, अजित पवार, राजू शेट्टी आदी नेते यावेळी उपस्थित होते. दरम्यान, महाआघाडीचे जागावाटप ठरले असले तरी काँग्रेसचे विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील यांनी या पत्रकार परिषदेकडे पाठ फिरवली आहे. विखे यांचे चिरंजीव डॉ. सुजय विखे हे बंडखोरी करत भाजपमध्ये डेरेदाखल झाले आहेत. त्यांना नगर दक्षिणमधून भाजपने लोकसभेचे तिकीट दिले आहे.

# पॅनकार्ड ग्रुपच्या मालवणातील हॉटेल सागर किनारावर पालिकेची कारवाई

**मालवण-** मालवण पालिकेच्या कर विभागाकडून शहरातील थकीत घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीसाठी धडक कारवाईस सुरूवात करण्यात आली आहे. नोटीस देऊनही घरपट्टी न भरणाऱ्या पॅन कार्ड ग्रुप हॉटेल सागर किनाऱ्याच्या दोन्ही इमारती वसुली पथकाने सील केल्या. दरम्यान, दोन्ही इमारतींवर नोटीस चिकटवून जप्तीची कारवाई केल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. थकीत घरपट्टी न भरल्यास जप्त केलेल्या इमारतीचा लिलाव करून त्यातून थकीत रक्कम वसूल करण्याचे अधिकार पालिका प्रशासनाला असल्याचे सांगण्यात आले. पॅनकार्डची सुमारे तीन कोटी रुपयांची ही प्रॉपर्टी असल्याचे सांगितले जात आहे. पाच लाख रुपयांच्या थकबाकीसाठी पालिकेकडून ही प्रॉपर्टी सील करण्यात आली आहे. हॉटेल सागर किनारा इमारतीची ३ लाख ५९ हजार आणि समोरील साई मातेसे रिसॉर्ट १ लाख ८३ हजार रुपयांची घरपट्टी थकीत असल्याचे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले.




वारंवार नोटीस बजावूनही रक्कम न भरल्याने ही कारवाई करण्यात आली. मुख्याधिकारी रंजना गगे यांच्या मार्गदर्शनाखाली गीतांजली नाईक, विजय रावले, शशिकांत देऊलकर, बस्त्याव फर्नांडिस, सचिन कासले यांच्या पथकाने कारवाई केली. हॉटेल सागर किनारा हे गेली दोन वर्षे बंदावस्थेत आहे. यामुळे हॉटेलची घरपट्टी भरलेली नाही. तसेच पॅनकार्डकडून लोकांचे पैसेही परत केले जात नसल्याने हे हॉटेल सुरू करण्यास ग्राहकांनी तीव्र विरोध केला. त्यामुळे हे हॉटेल सध्या बंद आहे. पालिका प्रशासनाने आता हे हॉटेल सील केल्यामुळे पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# भाजपच्या महाराष्ट्रातील प्रचारासाठी ४१ स्टार प्रचारकांची फौज

**मुंबई-** राज्यात निवडणुकीत प्रचारासाठी भाजपाने ४१ स्टार प्रचारकांची यादी तयार केली आहे. मोठ्या सभेपासून ते छोट्या सभागृहातील सभा असे भाजपाच्या प्रचाराचे सूत्र असेल. स्टार प्रचारकांमध्ये नरेंद्र मोदी, अमित शाह, लालकृष्ण अडवाणी, राजनाथ सिंह, देवेंद्र फडणवीस, योगी आदित्यनाथ, सुषमा स्वराज, शिवराज सिंह, मुख्तार अब्बास नक्वी, मुरली मनोहर जोशी, नितीन गडकरी, पीयूष गोयल या केंद्रीय नेत्यांसह राज्यातील माधव भंडारी, राम शिंदे, गिरीश महाजन अशा ४१ प्रमुख नेत्यांचा समावेश आहे. प्रत्येक लोकसभा निवडणुकीतील स्थानिक राजकारण, जातीय समीकरणे, विरोधी पक्षांचे उमेदवार अशा विविध गोष्टी लक्षात घेऊन ही प्रचारकांची फौज मैदानात उतरवली जाणार आहे. भाजपकडून आतापर्यंत लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांच्या तीन याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये लालकृष्ण अडवाणी,



शत्रुघ्न सिन्हा यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेत्यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. याशिवाय, बिहारमध्ये भाजपा, जदयू आणि एलजेपीच्या प्रदेशाध्यक्षांनी आघाडीच्या उमेदवारांची यादी जाहीर केली. आजपासून बरोबर दोन महिन्यांनी लोकसभेच्या निकालांचा कल स्पष्ट झालेला असेल. ११ एप्रिल ते १९ मे दरम्यान सात टप्प्यात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानाची मोजणी २३ मे रोजी होणार आहे.

अखिल भारतीय मानव अधिकार युनियन
सभासद नोंदणी सुरु
अध्यक्ष : श्री. दिपक मोरेश्वर नाईक मो. ८४२४९८९८९८
सचिव : श्री. विनोद दशरथ मेढे मो. ८६९२०११११०
सदस्य नोंदणी कार्यालय - २, राजाराम अपार्टमेंट.
बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), ठाणे - ४०१ १०५

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)